# प्रेसनोट

दि. १३/०९/२०२३

**राजगुरूनगर नगरपरिषद, खेड, जि. पुणे येथील आरोग्य विभागाचे मुख्याधिकारी, लेखापाल व अभियंता यांचेवर लाच मागणी करून स्विकारणे व त्यास प्रोत्साहन दिले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. चारुबला राजेंद्र हरडे, वय ३१ वर्ष, पद - अभियंता आरोग्य विभाग (वर्ग-३)<br>२) प्रविण गणपती कापसे, वय ३५ वर्ष, पद - लेखापाल (वर्ग-३)<br>३) श्रीकांत अण्णासाहेब लाळगे, वय ३५ वर्ष, पद - मुख्याधिकारी (वर्ग-२)<br>सर्व नेमणुक - राजगुरुनगर नगरपरिषद, खेड, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,०००/- रुपये (आठ हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ८,०००/- रुपये (आठ हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ११/०९/२०२३ व दि. १२/०९/२०२३ |
| सापळा दिनांक | १३/०९/२०२३ |

ठिकाण :- राजगुरुनगर नगरपरिषद, खेड, पुणे येथील कार्यालयामध्ये.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सरकारी ठेकेदार असून, त्यांनी राजगुरूनगर नगरपरिषद, खेड, पुणे येथील आरोग्य विभागाकरीता लागणारे साहित्य पुरवले होते. त्याचे एकुण ८०,७३०/- रुपयाचे बिल त्यांनी नगरपरिषद राजगुरूनगर येथे सादर केले होते. नमुद बिल काढून देण्याकरीता लोकसेवक श्रीमती चारुबला हरडे यांनी ८,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक श्रीमती चारुबला हरडे यांनी तक्रारदार यांचेकडे सदरचे बिल काढून देणेकरीता ८,०००/- रुपयांची लाचेची मागणी पंचासमक्ष करुन, ८,०००/- रुपये (आठ हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच क्र. २ लोकसेवक प्रविण कापसे व क्र. ३ लोकसेवक श्रीकांत लाळगे यांनी लोकसेवक श्रीमती हरडे यांना तक्रारदाराकडून लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले वरून, त्या तिघांविरुद्ध खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली आहे.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

सहायक पोलीस आयुक्त /पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.